NAREDCO MAHARASHTRA

MINEPRO COMMUNICATIONS
new-age image & reputation curators

पुण्य नगरी

# विमानतळांभोवतीच्या इमारतींच्या उंची मर्यादेवर तोडगा काढण्यासाठी अभ्यास

## नागरी विमान वाहतूक मंत्री यांची माहिती

**नवी दिल्ली :** विमानतळांभोवती इमारतींच्या उंचीवरील निर्बंधांच्या मुद्द्यावर लक्ष केंद्रित करण्यासाठी आंतरराष्ट्रीय नागरी उड्डयन संघटनेच्या मदतीने अभ्यास केला जात असल्याचे नागरी विमान वाहतूक मंत्री के. राममोहन नायडू यांनी सांगितले.

भारत हा जगातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या नागरी विमान वाहतूक बाजारपेठांपैकी एक आहे, सध्या देशात १६५ विमानतळ कार्यरत आहेत. पुढील पाच वर्षांत सुमारे ५० नवीन विमानतळ बांधले जाण्याचा अंदाज आहे. रिअल इस्टेट क्षेत्रात तेजी असताना उड्डाण सुरक्षिततेची खात्री करण्यासाठी विमानतळांभोवती इमारतींच्या उंचीवर निर्बंध घालण्यात आले आहेत. या पार्श्वभूमीवर, मंत्र्यांनी राष्ट्रीय राजधानीत रिअल इस्टेट उद्योग संस्था एनएआरईडीसीओने आयोजित केलेल्या 'राष्ट्रीय शहरी आणि रिअल इस्टेट विकास परिषद २०२६' ला संबोधित करताना नागरी विमान वाहतूक मंत्री के. राममोहन नायडू यांनी या अभ्यासासंदर्भात माहिती दिली.

नागरी विमान वाहतूक क्षेत्र सातत्याने वाढत आहे; परंतु विमानतळांभोवती इमारतींची उंची विशेषतः मुंबई, हैदराबाद, कोलकाता आणि चेन्नईसारख्या महानगरांमध्ये एक मोठी आव्हानात्मक बाब आहे. या समस्येचे निराकरण करण्यासाठी एक अभ्यास सुरू करण्यात आला आहे आणि आंतरराष्ट्रीय नागरी विमान वाहतूक संघटना यात सहभागी झाली आहे. अभ्यास पथक विविध शहरांना भेट देत आहे आणि तंत्रज्ञान आणि विमान कामकाजही संबंधित पैलूंचे मूल्यांकन करत आहे. सर्व सूचना आणि माहिती समाविष्ट करून एक अहवाल तयार केला जाईल, असे मंत्र्यांनी सांगितले.